# ORDER SHEET

| | |
|---|---|
| | **R.C.S. No. : 58/2025**<br>**CNR : MHKO170004862025**<br>***Subhash Shripati Kamble Vs. Dagadu Damaji Kamble etc 3*** |

## नि. ५ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुत दावा कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीतर्फे वकील श्री.बी.एस.आंबेकर यांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. वादीतर्फे वकील श्री.बी.एस.आंबेकर यांनी युक्तीवाद केला की, वादी यांनी प्रस्तुत दावा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. मूळची मिळकत ही दामाजी चंद्राप्पा कांबळे यांच्या मालकीची होती. त्यातील ०४.५० आर क्षेत्र हे बापू नारायण इरळेकर यांना विक्री केले होते. दामाजी कांबळे हे मयत झाल्यानंतर दावा मिळकतीस त्यांचे वारसांची नोंद झाली. त्यानंतर त्या वारसांनी वादी यास दावा मिळकत मधील क्षेत्राची विक्री केली. तसेच दावा मिळकती पैकी जे क्षेत्र बापू इरळेकर यांनी खरेदी केले होते ते क्षेत्र देखील वादी यांनी खरेदी केले. त्यामुळे संपूर्ण दावा मिळकत ही वादी यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. दावा मिळकतीत वादींनी बोअरवेल मारलेले असून त्यावर त्यांनी विद्युत मोटार पंप बसविला आहे. सदर दावा मिळकतीत वादी हे ऊस, भात अशी पीके घेत असतात. तसेच दावा मिळकती शिवाय वादी यांनी दावा मिळकतीच्या पूर्वेकडील भुमापन गट क्र. ३ मधील ०२.०० आर हे क्षेत्र खरेदी केले आहे. प्रतिवादी हे वादींचे बरोबर दावा जमीन भुमापन गट क्र. ४ मधील मिळकतीचे हद्दीवरुन वाद करु लागले. आणि वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु लागले. म्हणून वादी यांनी त्यांचे गट क्र. ४ ची शासकीय मोजणी ही मार्च २०२४ मध्ये करुन घेतली आहे. दावा मिळकत ही दक्षिण – उत्तर अशा स्वरुपाची असून दक्षिणेस रस्ता आहे आणि रस्त्यालगत गावठाणची हद्द आहे. वादी यांना गावठाण मधील राहण्यासाठी घर बांधणे जागे अभावी अडचणीचे आहे,म्हणून वादी यांनी दावा मिळकतीत दक्षिणेस घर बांधण्याचे ठरवून तशी मोजमापे घेऊन रेखांकन केले असता, प्रतिवादी यांनी दि. २७.०३.२०२५ रोजी तेथे येऊन बांधकाम करण्याचे नाही आमची मिळकत आम्हांस परत करा असे म्हणून वादी यांना हरकत व अडथळा केला. प्रतिवादी हे आर्थिक सबळ असल्यामुळे ते वादी यांच्या बांधकामास आणि शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत करण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीतर्फे वकील यांनी एकतर्फा तूर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होणारे आहे. त्यामुळे वादी यांचा एकतर्फा तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४.    कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकल्या शिवाय कोणताही आदेश करणे हे न्यायोचित होईल असे वाटत नाही. तसेच, प्रतिवादी यांना नोटीस बजावणी झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. उलटपक्षी नि.५ अर्ज सुनावणी होणे त्यामुळे सोयीचे होणारे आहे. तसेच, तुर्तातूर्त मनाई हुकूम पारीत करण्यापूर्वी प्रतिवादींचे म्हणणे ऐकणे हे न्यायहिताच्या दृष्टीने व प्रकरणांची गुंतागुत टाळण्याकरीता योग्य होईल असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी यांना त्यांचे विरुद्ध तुर्तातूर्त मनाई आदेश का पारीत करण्यात येऊ नये याकरीता दि. ०८.०४.२०२५ रोजीपर्यंत म्हणणे देण्यासाठी नोटीस पाठविण्यात यावी.

**सही/-**

दि. ०३.०४.२०२५

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.